| | | | |
|---|---|---|---|
| Published Date: | 14 Jul 2025 | Publication: | Sakal (Marathi) [Mumbai] |
| Journalist: | Vasant Kulkarni | Page No: | 10 |
| Circulation: | 23,692 | | |


# यशस्वी तिशी ओलांडणारा टाटा मिड कॅप फंड

स्मार्ट गुंतवणूक




वसंत कुलकर्णी

ज्येष्ठ गुंतवणूक सल्लागार


टाटा मिड कॅप फंडाने एक जुलै २०२५ रोजी ३१ वर्षे पूर्ण केली. या फंडात पंधरा वर्षांपूर्वी (एक जुलै २०१० रोजी) गुंतविलेल्या एक लाख रुपयांचे २७ जून २०२५ रोजी गुंतवणूक मूल्य ९.९२ लाख रुपये होते आणि गुंतवणुकीवर वार्षिक १६.५४ टक्के दराने परतावा मिळविलेला आहे. दहा वर्षांपूर्वी (एक जुलै २०१५ रोजी) गुंतविलेल्या एक लाख रुपयांचे ११ जुलै २०२५ रोजी गुंतवणूक मूल्य १७ लाख ७९ हजार ६४१ रुपये होते आणि गुंतवणुकीवर वार्षिक १६.३३ टक्के दराने परतावा मिळविलेला आहे. मागील दहापैकी सात कॅलेंडर वर्षे या फंड गट सरासरीपेक्षा अधिक परतावा मिळविण्यात हा फंड यशस्वी झाला आहे. मागील चार वर्षे फंड व्यवस्थापनाची धुरा सतीशचंद्र मिश्रा यांच्याकडे आहे. सतीशचंद्र मिश्रा यांची निधी व्यवस्थापक म्हणून नेमणूक झाल्यानंतर कामगिरीत चांगला बदल झाल्याचे दिसून आले. गेल्या चार वर्षांत फंडाने समाधानकारक परतावा दिला आहे. या मिड कॅप फंडाच्या कामगिरीत सातत्याचा अभाव होता. परंतु, २०२० मध्ये झालेल्या पोर्टफोलिओतील मोठ्या फेरबदलामुळे या फंडाने गेल्या तीन वर्षांत त्याच्या मानदंडासापेक्ष चांगली कामगिरी केली आहे. मागील पाच वर्षांत (एक जुलै २०२० ते २७ जून २०२५) फंडाने २७.३२ टक्के वार्षिक परतावा दिला असून, एक लाख रुपयांच्या गुंतवणुकीचे बाजारमूल्य ३.३६ लाख रुपये झाले आहे.



## वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ

फंडाच्या पोर्टफोलिओत मागील वर्षभरात ६३ ते ६८ कंपन्यांचा समावेश होता. गेल्या १२ ते १५ महिन्यांत निधी व्यवस्थापकांनी पोर्टफोलिओमध्ये बँकिंग, आर्थिक सेवा आणि विमा (बीएफएसआय), आरोग्यनिगा, भांडवली वस्तू, वाहन, रसायने आणि सेवा क्षेत्र यांचा समावेश केला आहे. मॅक्स फिनान्शियल, अल्केम लॅब, कमिन्स इंडिया, ज्युबिलंट फूड वर्क्स, एयू स्मॉल बँक या कंपन्यांवर जास्त भर आहे. आयटी, एफएमसीजी आणि फार्मास्युटिकल्स यांचा हिस्सा २४ टक्के आहेत. दीर्घकालीन तेजीत या क्षेत्रांची कामगिरी चांगली होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे मध्यम ते दीर्घकालीन कालावधीत चांगला परतावा देण्याची क्षमता आहे. आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी बँक, इन्फोसिस, एसबीआय आणि टीसीएस या फंड पोर्टफोलिओमधील सर्वोच्च पाच कंपन्या असून, त्यांचा पोर्टफोलिओतील हिस्सा १८ टक्के आहे, तर सर्वोच्च दहा कंपन्यांचा वाटा ३१ टक्के आहे.

## संपत्तीनिर्मितीसाठी योग्य पर्याय

टाटा मिड कॅप फंडातून संपत्तीनिर्मितीसाठी गुंतवणूक कालावधी प्रदीर्घ असणे आवश्यक आहे. हा फंड निवृत्तीनियोजन, मुलांचे शिक्षण आदी विविध दीर्घकालीन गुंतवणूक उद्दिष्टांसाठी योग्य आहे. गुंतवणूकदार त्यांच्या आर्थिक नियोजनाच्या गरजेनुसार एकरकमी किंवा 'एसआयपी' पद्धतीने गुंतवणूक करू शकतात. फंडाचा लाभांशदेखील चांगला आहे. मिड कॅप फंड असल्याने फंडाच्या गुंतवणुकीत जोखीम अधिक आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांनी गुंतवणूक करण्यापूर्वी योजनेशी संबंधित कागदपत्रे काळजीपूर्वक वाचावीत आणि म्युच्युअल फंड सल्लागारांशी सल्लामसलत करावी.